नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६ Issue - 6 | वार शुक्रवार दि. २३ मे २०२५ Blow- Friday Date 23 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नो ट्रेड, नो टॉक्स, आता फक्त पीओकेवर चर्चा

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; दहशतवादाविरुद्ध भारताने घेतलेल्या निर्णयांमध्ये कोणत्याही देशाचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानला स्पष्ट इशारा दिला आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे मोठा धक्का दिल्यानंतर, पंतप्रधान मोदींनी सीमावर्ती जिल्ह्यात झालेल्या जाहीर सभेद्वारे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना कडवट संदेश दिला आहे. मोदी म्हणाले की, 'पाकिस्तानसोबत ना व्यापार होणार आहे ना कोणती चर्चा. आता चर्चा होणार असेल तर ती फक्त पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओकेबद्दल असेल.



पंतप्रधानांनी राजस्थानातील बिकानेरमध्ये केलेल्या भाषणात पाकिस्तान आणि दहशतवादाच्या मुद्द्यांवर भर दिला. दहशतवाद-ावर कडक भूमिका घेत पंतप्रधान मोदी म्हणाले की, जर आता भार-तात कोणतीही दहशतवादी घटना घडली तर भारत दहशतवाद्यांना आणि दहशतवादाला आश्रय देणाऱ्या सरकारला स्वतंत्र घटक म्हणून पाहणार नाही. यावेळी, पंतप्रधानांनी जगाला स्पष्ट संदेश दिला की दहशतवादाविरुद्ध भारताने घेतलेल्या निर्णयांमध्ये कोणत्याही देशाचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही.

खरंतर पंतप्रधान मोदींचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्याकडेही होता, ज्यांनी दोन्ही देशांच्या संघर्षात असा दावा केला होता की, भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीदरम्यान त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तथापि, नंतर ट्रम्प आपल्या दाव्यापासून मागे हटले. दुसरीकडे, भारताकडून सतत असे म्हटले जात होते की, युद्धबंदीचा निर्णय द्विपक्षीय होता. यामध्ये कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी किंवा हस्तक्षेप नव्हता. यासोबतच भारताने असेही म्हटले की, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही.

तज्ज्ञांच्या मते, पंतप्रधान मोद-ींनी ज्या पद्धतीने 'नो ट्रेड, नो टॉक्स, आता फक्त पीओकेवर चर्चा होईल' असे म्हटले आहे, हा शेजारी देशाला कडक संदेश आहे.

पंतप्रधान मोदींनी जगाला स्पष्ट सांगितले की, पाकव्याप्त काश्मीरचा प्रश्न सुटेपर्यंत पाकिस्तानशी कोणत्याही प्रकारची व्यापारी चर्चा होणार नाही. एवढेच नाही तर सिंधू पाणी कराराचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताच्या हक्काचं पाणी पाकिस्तानला मिळणार नाही.

पंतप्रधान मोदींनी असाच पीओकेचा उल्लेख यावेळी केलेला नाही. पीओकेमधील बहुतेक दहशतवादी छावण्या पाकिस्तान चालवतो, असे आरोप झाले आ-हेत. येथेच दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते.

पीओके म्हणजे पाकव्याप्त काश्म ीर, पीओकेबाबत भारतात नेहमीच आवाज उठवत आला आहे. आता पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. पंतप्रधानांनी जगभरातील देशांसमोर भारताची भूमि का स्पष्ट केली.

# देशातील वातावरणात बदल, पुढील ६ ते ७ दिवस तुफान पाऊस पडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. अनेक भागात मान्सूनपूर्व पा-वसाला (ठरळप) जोरदार सुरुवात झाली आहे. तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळं जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, पुढील ६ ते ७ दिवस पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे गुजरात, कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



दक्षिण कोकण-गोवा किनाऱ्यापासून पूर्वमध्य अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र आहे. ते उत्तरेकडे सरकण्याची आणि २३ मे २०२५ च्या संध्याकाळच्या सुमारास तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यामुळं पुढील ६ ते ७ दिवस पश्चिम किनाऱ्यावर (गुजरात, कोकण आणि गोवा, कर्नाटक आणि केरळ) मुसळधार ते अतिम ुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आजपासून म्हणजे २२ ते २४ मे २०२५ रोजी कोकण आणि गोव्यात आणि २४ मे २०२५ रोजी कर्नाटकच्या किनारपट्टीवर अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पुढील २ ते ३ दिवसांत केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. २२ ते २६ मे २०२५ रोजी राजस्थानमध्ये उष्णतेची लाट ते तीव्र लाटांची परिस्थिती आहे. २२ आणि २३ मे २०२५ रोजी पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि पूर्व राजस्थानमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यामधील गुहागरमध्ये दुपारनंतर पावसाचा जोर वाढल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळं सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. पेरणीच्या आधीच मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांची कामे देखील खोळंबोली आहेत, शिवाय आंबा बागायतदारांना देखील पावसाचा मोठा परिणाम झाल्याचे बघायला मिळत आहे. हवामान विभागाकडून आज आणि उद्या जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जाहीर करण्यात आला असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत.

मागील तीन दिवसांपासून यवतमाळ जिल्ह्यात मान्सूनपूर्व वादळी वारा व विजेच्या कडकडाट पावसाने हजेरी लावीत आहे. आज सकाळपासून ढगाली वातावरण असून अकरा वाजता पा-सून पावसाची रिमझिम उघडीप सुरू आहे. दोन दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे वाता-वरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांची उकड्यापासून सुटका झाली. आगामी खरीप हंगाम ाच्या मशागतीसाठी हा पाऊस उपयुक्त ठरत आहे. तर काही भागात उन्हाळी पिके आणि फळबागेळा पालेभाज्या यांना काहीसा फटका बसत आहे.

# महाराष्ट्रातील २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात गृह विभागाकडून सध्या बदल्यांचा धडाका सुरु आहे. नुकतंच काही दिवसांपूर्वी गृह विभागाने १७ मे रोजी २७ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश जारी केला होता. त्यानंतर लगेच पाच दिवसांनी आज पुन्हा एकदा तब्बल २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची घोषणा करण्यात आली आहे. या घोषनेनंतर राज्यातील तब्बल १३ जिल्ह्यांना नवे पोलीस अधीक्षक मिळाले आहेत. विशेष म्हणजे शासनाकडून काल खड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. यानंतर आज खझड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये अहिल्यानगरचे पो-लीस अधीक्षकांसह रायगड, कोल्हापूर, अकोला, नागपूर, पालघर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे.



अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची मुंबईच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य राखीव पोलीस बल, पुणे येथील समादेशक आंचल दलाल यांची रायगड पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांची ठाणे शहर पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नांदेड नागरी सुरक्षाचे पोलीस अध-ीक्षक योगेश गुप्ता यांची कोल्हापूरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

अकोलाचे पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ४ नागपूरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नागपूर शहर पोलीस उपायुक्त अर्चित चांडक यांची अकोला पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई आर्थिक गुन्हे शाखेचे मंगेश शिंदे यांची नागपूरच्या लोहमार्ग पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईचे सहायक पोलीस म हासंचालक राजातिलक रोशन यांची म ुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पालघर पोलीस अधीक्षक बाळास-ाहेब पाटील यांची नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गडचिरोलीचे अप्पर पोलीस अधी-क्षक यतिन देशमुख यांची पालघर पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सिंधुदुर्गचे पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांची पुणे गुन्हे अन्वेषण विभाग येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

ठाण्याचे पोलीस उपायुक्त मोहन दहिकर यांची सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बुलढाणाचे पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची राज्य राखील पोलीस दल अमरावती येथे समादेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नागपूर गुन्हे अन्वेषणचे निलेश तांबे यांची बुलढाणा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

साताऱ्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांची मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे लोहमार्ग पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांची सातारा पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आगे.

लातूर पोलीस अधीक्षक सोमया मुंडे यांची संभाजीनगर परिमंडळ १ च्या पो-लीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे दहशतवादविरोधी पथकाचे पो-लीस अधीक्षक जयंत मीणा यांची लातूर पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

संभाजीनगरचे उपायुक्त नितीन बगाटे यांची रत्नागिरी पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सांगलीचे अप्पर पोलीस अधीक्षक रितू खोकर यांची धाराशिव पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



# केंद्र सरकारकडून तूर खरेदीला २८ मे पर्यंत मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील तूर उत्प-ादक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता पीपीएस अंतर्गत नाफ ेड आणि एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीस आता केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २८ मे २०२५ पर्यंत मुदत वाढवून दिली आहे. यामुळे राज्यातील तूर उत्प-ादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. तूर उत्प-ादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेत, केंद्र सरकारने तूर खरेदी मुदत वाढवून दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे आभार मानले आहेत.

राज्यात तूर खरेदीची मुदत १३ मे २०२५ पर्यंत देण्यात आली होती. तूर उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता तूर खरेदीची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्र सरकारकडे केली होती. तसा प्रस्ताव पणन विभागाकडून केंद्रीय कृषी आणि कल्याण मंत्रालयाला पाठविण्यात आला होता. या म ागणीची दखल घेत ही मुदत २८ मे २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. राज्यात १ लाख ३७ हजार ४५८ शेतकऱ्यांची तूर खरेदीसाठी (पान २ वर..)

### २६ मे पासून सुरू होणार; ३ जूनपर्यंत करा अर्ज

### तांत्रिक अडचणींनी विद्यार्थी त्रस्त

# विद्यार्थ्यांनो, अकरावी प्रवेशाची वेबसाईट ४ दिवस बंदच राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील उच्च माध्यमि क बोर्डाकडून ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झालाय. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळा-पत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश २६ मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या २ दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी ४ दिवस थांबावे लागणार आहे. २१ मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होण-ारी ऑनलाइन अकरावी प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण म हामंडळाकडून २६ मे ही नवी तारीख देण्यात आली असून २६ मे ते ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल.

राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, २६ मे ते ३ जूनपर्यंत म्हणजे ९ दिवस ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, ५ जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. ६ ते ७ तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, ८ जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.



राज्यात शास-नाची वेबसाईट सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे, आता ही प्रवेश प्रक्रियाच पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही प्रवेश प्रक्रिया सोमवारपासून म्हणजेच दिनांक २६ मे पासून सुरू होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २६ मे ते ३ जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी १० जून-ला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, याप्रूवी २१ मे रोजी सुरू करण्यात आलेली विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा पहिल्या फेरीसाठी २८ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार होती. मात्र, ती प्रक्रिया रद्द झाली असून नव्याने वेळा-पत्रक जाहीर करण्यात आलं आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक वेळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आह-ोत. प्रवेशाचे वेबपोर्टल मोबाईलद्वारे हाताळताना अधिक सुलभ व्हावे यासाठी काही वेळासाठी पोर्टलची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे, असे बोर्डाकडून सांगण्यात आलं आहे. तसेच, विद्यार्थी आणि पालकांनी गोंधळून जाऊ नये. साईट सुरू झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या अपडेट देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्स अप चॅनेलवर आपल्याला लगेच माहिती देण्यात येईल, असेही शिक्षण संचालनालयाने म्हटलं आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाईट मध्ये तांत्रिक अडचणी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रम ाणात अडचणी येत आहेत.अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीनं राबविण्यात येतेय. त्यामुळं एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध झालाय. मात्र, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशाच्या संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येत नाहीये. यावर शिक्षण संचालनालयकडून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यासंदर्भात काम सुरू आहे.

## संपादकीय....

### अतिमुसळधार पाऊस

पुढील २ ते ३ दिवसांत केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. २२ ते २६ मे २०२५ रोजी राजस्थानमध्ये उष्णतेची लाट ते तीव्र लाटांची परिस्थिती आहे. २२ आणि २३ मे २०२५ रोजी पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि पूर्व राजस्थानमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. अनेक भागात मान्सूनपूर्व पावसाला जोरदार सुरुवात झाली आहे. तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळं जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, पुढील ६ ते ७ दिवस पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे गुजरात, कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण कोकण-गोवा किनाऱ्यापासून पूर्वमध्य अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र आहे. ते उत्तरेकडे सरकण्याची आणि २३ मे २०२५ च्या संध्याकाळच्या सुमारास तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यामुळं पुढील ६ ते ७ दिवस पश्चिम किनाऱ्यावर (गुजरात, कोकण आणि गोवा, कर्नाटक आणि केरळ) मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार कर्नाटकच्या किनारपट्टीवर अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.


# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात जमा होणाऱ्या निर्माल्यापासून

# धुप व अगरबत्तीची करण्यात येणार निर्मिती

## धुप व अगरबत्ती उत्पादन होईपर्यंत दर्शनरांगेतील भाविकांना हार फुले देण्याची कार्यवाहीस सुरूवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिरात जमा होणाऱ्या निर्माल्यापासून धुप व अगरबत्ती तयार करून भाविकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंदिर समितीने यापूर्वीच घेतला असून, यासाठी श्री ऋषिकेश भट्टड, प्रभव आरोमॅटिक्स, पंढरपूर यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे. त्यांचेकडून श्रींच्या निर्माल्यापासून धुप व अगरबत्ती तयार करण्याचे काम सुरू करण्यात असून, भाविकांना आषाढी यात्रा २०२५ पूर्वी धुप व अगरबत्ती उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



मंदिरात येणारे भाविक भक्तीभावाने श्रींस तुळशी, हार व फुले अर्पण करीत असतात. अर्पण केलेल्या हार-फुलांपासून धुप व अगरबत्ती तयार करण्यासाठी यापूर्वी थर्ड वेव्ह टेक्नॉलॉजीज, पुणे यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला होता. तथापि, त्यांनी प्रतिसाद न दिल्याने त्यांचा प्रस्ताव रद्द करून श्री ऋषिकेश भट्टड, प्रभव आरोमॅटिक्स, पंढरपूर यांना सदरचे काम देण्यात आले आहे. त्यांचेकडून तीन ते चार प्रकारच्या अगरबत्त्या तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप व श्री संत तुकाराम भवन येथे लवकरच स्टॉलद्वारे अल्प देणगी मुल्य आकारून भाविकांना धुप व अगरबत्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्याची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत यांना देण्यात आली आहे.

**निर्माल्याचे पावित्र्य जपण्यात येणार**

सदर निर्माल्यापासून धुप व अगरबत्ती उत्पादनास प्रत्यक्ष सुरवात होऊन भाविकांना उपलब्ध होईपर्यंत श्रींच्या गाभाऱ्यात जमा होणारी हार-फुले दर्शनरांगेतील भाविकांना देण्यात येत आहेत. भाविकांना श्रध्देला तडा जाणार नाही याची दक्षता मंदिर समितीने घेतली असल्याचे यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगितले.

# दुधनीतील नागरिकांसाठी पर्यायी रस्ता करुनच काम चालु करावे अन्यथा काम करु नये : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (तालुका प्रतिनिधी) अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे रेल्वे स्टेशन च्या अंडर ग्राऊंड रस्त्याचे काम चालु असल्यांने पूर्वीच्या रहदारी रस्ता बंद आहे. पर्यायी रस्ता तयार करुनच काम चालु करण्यात यावे.अशी मागणी रिपब्लिकन पक्ष(आठवले गट)चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे केली आहे. दुधनी रेल्वे स्टेशनजवळ सध्या अंडर ग्राउंड ब्रिजचे काम सुरू आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांना गावात ये जा करण्यासाठी,पर्यायी रस्ता नसल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.सध्या वाहतुकीसाठी असलेला पर्यायी मार्ग कच्चा व अत्यंत सादा आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात चिकल होत असल्यामुळे नागरिकांच्या हाल होत आहे. विशेषतः गर्भवती महिला,वयोवृद्ध माणसे, लहान मुले आणि विद्यार्थ्यांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. चिकल व धुळीमुळे परिसरातील हवेची प्रदूषण दूषित होत आहे.



या जर्जर रस्त्यामुळे नागरिकांना शाळा, रुग्णालये आणि दैनंदिन कामांसाठी ये-जा करण्यासाठी हा एकच रस्ता असल्याने लोकांना रहदारी साठी बिकट व अत्यंत कठीण झाले आहे.सध्या सुरु असलेल्या पावसामुळे या रस्त्यावर चिखल साचला आहे, ज्यामुळे ये-जा करणारी वाहने घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच, पावसाच्या पाण्याचा निचरा याच ब्रिजच्या जवळून होत असल्याने तिथे पाणी साचून मोठी समस्या निर्माण झाली आहे.

तरी या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन पर्यायी मार्गाची त्वरित व्यवस्था करून योग्य उपाययोजना करावी, जेणेकरून नागरिकांचे सुरक्षित सुनिश्चित होईल.

या समस्यांचे निवारण करण्याची ही मागणी केली आहे. तरी लवकरात लवकर जातीने लक्ष घालून पर्यायी रस्ता बनवण्यात यावी अन्यथा रिपब्लिकन पक्ष(आठवले गट)च्या वतिंने आंदोलने छेडण्यात येईल.अशा इशारा रिपाइं चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष

श्री.सैदप्पा झळकी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनावर सैदप्पा झळकी व रिपाइं दुधनी शहर अध्यक्ष श्री.गोरखनाथ धोडमनी यांच्या सह्या आहे.

# गंभीर जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) गंभीर जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रमाणे एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी प्रशांत शंकर बिच्चल (वय-३०,रा. घोंगडे वस्ती यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून सुनील दत्तू पवार (वय-२८,रा.मंगळवार पेठ,सावरकर चौक,तुळजापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची आई अंबाबाई व भाचा प्रथमेश असे मिळून शंकर चिकणी यांच्या दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डी.डी.६५२८ यावरून जुना विडी घरकुल कडे जात असताना वरील संशयित आरोपी याने त्याच्या ताब्यातील माल ट्रक क्रमांक एम.एच.१३.एक्स.३५६८ हे वाहन भरधाव वेगात चालून फिर्यादी यांच्या आईला मागून धडक दिल्याने त्या खाली पडून माल ट्रक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यात त्या गंभीर जखमी झाल्या आहेत.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दुधाळे हे करीत आहेत.

## केंद्र सरकारकडून तूर खरेदीला....

(पान १ वरून..) ऑनलाईन नोंदणी झालेली असून त्या पैकी १३ मे २०२५ पर्यंत ६९,१८९ शेतकऱ्यांकडून १,०२,९५१ मे.टन तूर खरेदी झालेली आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरेदी प्रक्रियेसाठी ९० दिवसांची मुदत १३ मे २०२५ रोजी संपली होती. उर्वरित नोंदणीकृत शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी होण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी होती. केंद्र सरकारने राज्याला सन २०२४-२५ हंगामात पीपीएस अंतर्गत २ लाख ९७ हजार ४३० मेट्रिक टन तूर खरेदीला मंजुरी दिलेली आहे. त्याकरिता नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल संस्थांच्या माध्यमातून राज्यातील ८ राज्यस्तरीय नोडल संस्थांमार्फत ७६४ खरेदी केंद्र राज्यात कार्यान्वित आहेत. राज्यात नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून ७,५५० रुपये हमीभावाने तुरीची खरेदी चालू आहे. सध्या बाजारात तुरीचे दर कमी असल्याने हमीभावाचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. यासाठी उर्वरित शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी होण्यासाठी तूर खरेदीला मुदतवाढ मिळावी, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली होती.

# अनंताचा विवेकशील विद्रोह

-प्रा.गौतम गायकवाड, अंबाजोगाई

आंबेडकरवाद मानवी जीवनातील बहुसंख्य प्रश्नांची उत्तरे देतो. आंबेडकरवाद जगातील सर्वाधिक दुःखी विषमता ग्रस्त माणसांच्या मुक्तीचा विचार मांडतो. जगातील वर्णवाद, वंशवाद, गरीब-श्रीमंत भेद मिटवून सवांना समानतेच्या वाटेवर आणणारा विचार आहे. तथागत बुद्धानंतर या जगाची पुनर्रचना करणारा विचार आहे आंबेडकरवाद जगातील बहुसंख्या माणसांच्या हिताचा, सुखाचा विचार करणारा आहे. ते माझे मी त्यांचा हा एकच ओघ वाहते ठेवणारा विचार आहे.

आपण सर्व माणसं आहोत. माणसांच्या पोटी जन्माला आले. जन्म-मृत्यू आपल्या हाती नाही. कुशल कर्म आपल्या हाती आहे. स्वतः जगायचे, दुसर्यांनाही जगू द्यायचे, त्यासाठी आपल्याकडे जे जे अतिरिक्त असेल ते दुसर्यांचे जगणे सुखाचे करण्यासाठी दान करावे, अतिरिक्त कोणतेही धन असो ते वितरीत करण्यात जीवनाचे सार्थक आहे. जीवन जगण्यासाठी जेवढे गरजेपुरते तेवढे ठेवून अतिरिक्त साधन संपत्ती दुसर्याच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी देवून टाकावे, हे माणूस म्हणून आपले खरे कर्मकर्तृत्व आहे. जसे रिकामे आलो तसे रिकामेच जाणार आहोत. शेवटी तुमचे कुशल कर्म तुम्हाला जिवंत ठेवते. असे एक जग, नवी समाज रचना भारतीय संविधान आधारे निर्माण करावयचा विचार तत्वज्ञानात आहे. तीच या देशाची खरी संस्कृती आहे. त्यासाठी बुद्धाने राजगृह सोडून ४५ वर्षे चरक भिक्खवे चारिकम करीत भवतु सबब मंगलमसाठी काया, वाचा, मन विचार, धन सर्वकाही लोकसेवेसाठी खर्ची घातले. त्यांच्या विचाराच्या तत्वज्ञानाच्या वाटेवर बाबासाहेब पाऊल टाकले. या बुद्ध-प्रबुद्ध समतेच्या रथाचे आपण ही वाहक झाले पाहिजे. वामन कर्डक यांनी वाट फुलेची सोडून, आंबेडकरांना सोडून तुला चालताच येयाचे नाही, त्यांना सोबतीला घेवून जीवन जगणार्या माणसाच्या जीवनाचे सार्थक होणार आहे. अंतिमत भुकेल्याची भूक आणि तान्हेल्याची तहान भागवणारी भारतीय संस्कृताची शिकवण आहे. ती शिकवन बुद्ध ते प्रबुद्धा पर्यंत चालत आलेली आहे, ते यापुढे चालु ठेवली पाहिजे. हे बुद्ध-प्रबुद्धाचे तत्वज्ञान सर्वांने प्रबुद्ध बुद्ध होण्यासाठीच आहे. तुम्हीही बुद्ध-प्रबुद्ध होऊ शकता. त्यासाठी बुद्ध-प्रबुद्धाप्रमाणे कुशल कर्म करून सदाचारी जीवन जगले पाहिजे. तेवढेच आपल्या हातात आहे. अन्यकाही खरे नाही. आज आहात. उद्या नाही, जग अनित्य आहे. परिवर्तनशील आहे. या जगात अंतिम असे काहीच नाही आलोत शुन्यातून शुन्यातच जावावे लागेल. या विद्रोहा अनंता पर्यंत अनंताने कशासाठी करायचा आहे. या विद्रोहा मागे जागृत विवेक आहे. हा विवेकशील विद्रोह आहे. या विद्रोहात द्रोह नाही माणसाने थोडसं माणसासारखे वागावे, जगावे, इतरांनाही माणूस म्हणूनच वागवावे माणूस म्हणून जगावे, मरावे, भीमामुळे माणूस माणसात आला. त्या माणसांच्या माहोलात परिघात बसून सांगेन चार गोष्टी युक्तीच्या, माणुसकीच्या..सांगणे माझ्या हाती आहे, वागणे तुमच्या हाती आहे. त्यासाठी हा अनंताचा विद्रोह आहे. हा विद्रोह कुणावरतरी कुणीतरी अन्याय-जुलूम केला म्हणूनच जन्माला आल. जन्मताच माणूस व्रिदोही नसतो. तो करूणामय असतो, ही करूणामय वात्सल्याची भावना अनंताच्या विद्रोही संकल्पनेमागे आहे. विद्रोह हे एक सौंदर्यमुल्य आहे. मानवाचे जगणे अधिकाधिक सुंदर करण्यासाठीच दिवसेंदिवस पाऊले टाकत बुद्ध-प्रबुद्धाच्या विचार-अंगीकारून जीवन जगण्यातच जीवनाचे सार्थक आहे.

बुद्धाने रोहिणी नदीच्या पाण्यावरून गृहत्याग केला. हा एक त्या लोकांच्या वर्तनाविरूद्धचा विद्रोहच होता. तर बाबासाहेबांचा विद्रोह प्रसंगानुरूप ही व्यवस्था नीट करण्यासाठी जन्मला आला. तो अत्यंत प्रगल्भ, विवेकशील आहे. बुद्धा-सोबत प्रबुद्ध घेवूनच जगावे लागते. इच्छा आणि गरज हा तथागत बुद्धाचा सिद्धांत अंगीकारून चालणारे प्रबुद्ध हवे आहेत. त्यासाठीच कलावंताचे साहित्यिकांचे बोलणे, लिहिणे, आहे. ते विचार प्रगटीकरण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानात देते, बुद्ध तत्वज्ञान देते, जे हे विचाराचे स्वातंत्र्य देतात, समजून घेतात. जिथे विचाराचे अदान-प्रधान होते. तिथे विवेकाला उत्कृष्ठ दृष्टी प्राप्त होते. त्या दृष्टीला ही सृष्टी उत्तमच दिसते. बुद्ध-प्रबुद्ध विचाराची दृष्टी सृष्टी उत्तम दिसते. ते तुमच्या माझ्याही दृष्टीला दिसले पाहिजे. हे विचाराचे स्वातंत्र्य मिळते तो विचार जग स्विकारते, बुद्ध- प्रबुद्धाचे विचार कलसुसंगत लोकांना पटताहेत, म्हणून जगात सर्वाधिक भाष्य या बुद्ध-प्रबुद्ध विचारावर होताहेत त्यांचाच एक भाग विद्रोह अनंताचा. आंबेडकरवादी वाङ्मयाचे मुख्य प्रयोजन भारतीय समाजात परिवर्तन घडवून समताधिष्ठित, विषमतारहित एक एक नवी समाजरचना भारतीय संविधान अधारे निर्माण करणारा विचार आहे. आंबेडकरवादी वाङ्मयनिर्मितीला अनुभवाचे अधिष्ठान आहे. आणि अनुभवातून जन्माला आलेले वङ्मय हे सर्वश्रेष्ठ असते. अनुभवातून शहाणपण येते आणि वाचण्यातून ज्ञानपण येते. ते माणसाला माणूस मिळवून देते 'हेच हवे आहे. भाकर हवीच थोडीशी प्रतिष्ठाही हवी आहे. आंबेडकरवादी वङ्मय जीवनवादी असून जीवनातून कलेचा जन्म होतो. मानवाच्या मुलभूत गरजा भागवल्याशिवाय कलेचा जन्मच होत नाही. कलेची उपासना करता येते. अगोदर माणसाला माणसात आणणे, या प्रगत समाजात आणण्यासाठीच असंख्य वैचारिक, ग्रंथ, कथा, कादंबर्या नाटके, कविता अनेक अंगाने आंबेडरवाद समजात रूजविण्यासाठी त्या विचाराच्या वाटेनी जाण्यातच मानवाचे हित सुख आहे. याची लोकांना जाणीव करून देण्यासाठी वङ्मय प्रबोधनाचे, समाज जागृतीचे साधन-शस्त्र म्हणून पाहिजे जाते. मानवाने निर्माण केलेली साधन सामुग्री, शस्त्र, शास्त्र, ज्ञान, धन आदी मानवाच्या सुखासाठी, कल्याणासाठीच आहे. इच्छा आणि गरजानुसार साधन संपत्तीचा, ज्ञानाचा, शास्त्राचा, धनाचा उपयोग केला पाहिजे.

प्रारंभी ज्ञान शस्त्राचा उपयोग जपून केला पाहिजे. ज्ञान हे जगातील सर्वश्रेष्ठ शस्त्र आहे. शब्दानेच पेरतात घरे-दारे आणि देश सुद्ध शब्दच विझवतात आग पेटलेल्या घराघराची शब्दानेच माणस जवळ आली. वामन निंबाळकराप्रमाणे शब्दाचे धन सर्वश्रेष्ठ असल्याचे संत तुकोबाने ही सांगितले आहे. तेच ज्ञान जगात सर्वश्रेष्ठ असलेली शक्ती आहे. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दाखवून दिले आहे. म्हणून कवी अनंत जाधव म्हणतात.

शब्द सुसंवाद, साधण्याचे साधन
शब्दांना हवे सु विचाराचे बंधन
शब्दांनी माणसं तोडली
जोडली जतन शक्य आहे योग्य वापरावे (२०)
शब्द थोडसे वापरा जपून
शब्द वादाळ, ठरते कारणम (३५)

चहुअंगाने धार असते. पिढ्या मारता आणि जगवताही येतात. म्हणून कवी अनंत जाधव हे महात्मा फुले यांच्या अखंडाचा दाखला देताना म्हणतात.

'विद्याविना वदले फुले, मती गेली वित्त गेले.
अर्थहीन जीवन झाले, एवढे अनर्थ विद्येने केले (१११)

शाळा शिकून मिळवलेल्या ज्ञानशास्त्राने पिढ्यापिढ्या माणसं इथे मारली गेली. आणि त्याच ज्ञान शस्त्राने बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षे गुलामीतून माणसांना बाहेर काढून माणंस केले, माणसात आणले. अनंत माझ्या जीवनाचे सोने झाले ते खरे आहे. बाबासाहेब परिसाने सराफाने आमचे जीवनाचे सोने केले. ते आमच्या देव चेहादेव त्याहीपेक्षा सर्वश्रेष्ठ आहेत. खरा देव माणसात, माय-बापात आहे. (२२) म्हणून परमेश्वर शोधण्यात कित्येक पिढ्या गेल्या, परमेश्वराची भक्ती, आराधना करणार्या माणसाचे वर्तन पशुवत दिसते. माणसे शिकले, बंगले बांधले, कॉलनी झाल्या. तिथे ओपन पेस मध्ये मंदीरे उभारले. मंदीराला कुल्पे लावली गेली, देवाच्या दरबारात राहणारे, देवाची पुजा करणारी माणसं आली का माणसातले पशुत्व वाढले? म्हणून कवी अनंता म्हणतात...

कुठे कुठे शोधू तुला
सांग देवा राया
तुझा शोध घेणार्यांचा
जन्म गेला वाया (पृ.क्र.४७)

माणसं माणसातून उठली, पशु झाले. तिथे देव दगडात कुठून येणार आहे. देव या महापुरूषामध्ये असल्याचे धडे वर्गात शिकवले गेले पाहिजेत.

देश घडवतील असाच गुरजी
शाहु-आंबेडकर- गांधी-फुल्यांची
कथा तुलना ऐकवा (पु.क्र.६६)
आणि आज ते शिकवले गेले, जात आहे म्हणून बाबासाहेब अनुयायांनी
पुस्तके महाग केली. दिशाभूमी, चैत्यभूमी येथे कोटी-कोटी रूपयाचे
पुस्तके विकले जात आहेत, ते वाचले जात आहेत, कारण
वाच अनंता
पुस्तकात भीम आहे
ज्ञान देणार्या
ग्रंथात भीम आहे
सुवर्ण इतिहासाच्या
पानात भीम आहे (५)

जगात सर्वश्रेष्ठ ज्ञानीवंत वाचल्याने मानवी जीवनातील आधार नष्ठ होवून प्रकाशात होताहेत. आंबेडकर विचारातच मानव मुक्तीचा विचार आहे, त्या पथाने जाण्यातच जीवनाला अर्थ येतो म्हणून...

भीम पथाने आज भारता हा
समाज पुढे जात आहे
तुझ्या शौर्याचे अमोल कर्माचे
गीत सुखाने गात आहे (पृ.क्र.१००)

कारण या विश्वात बुद्ध-प्रबुद्ध विचार शाश्वत होत जातो आहे. कारण बुद्ध नीतीत/कुशल कर्मात/ बुद्ध शोधावा/ अनंता विज्ञानात/ बुद्ध ज्ञानाच्या पुस्तकात आहे.(पृ.क्र.९०) ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ शस्त्र असल्यानेच बुद्ध- प्रबुद्धांना जग स्विकारत आहे. बाबासाहेबांना जगाने ज्ञानाचे सिबॉल मानले आहे. माणसाने माणूस म्हणून वागावे, वागवावे, माणसात आले पाहिजे. माणसातले पशुत्व घालवून टाकण्याचे सामर्थ्य बुद्ध-प्रबुद्धाच्या विचारात आहे.

बुद्ध- प्रबुद्धांच्या अनुयाने ज्ञान घेवून शहाणे झाले. त्यांनी इतराने शहाणे करून या प्रगत समाज प्रवाहात आणण्यासाठी, पहावे थोडेसे मागे वळुन असे कवी म्हणतात.

पुढे गेलास काही कोस चालुन
पहावे थोडेसे मागे तू वळून
तुझे भाऊ ते राहिले मागे
त्यांना सांगत जावे थोडे घेवून (१०६)

ही अपेक्षा शिकले-सवरलेल्यांकडून, साहित्यिकांकडून बाबासाहेबांनी व्यक्त केली होती. याची कवीनी आठवन करून दिलेली आहे.

बुद्ध-प्रबुद्धांच्या अनुयायाने मागे राहिलेल्या माणसांना माणूस म्हणून आपल्या सोबत घेवून चालले, जीवन जगले पाहिजे. मानवी जीवनात प्रश्न एवढे प्रश्न आहेत साडेवायला आयुष्य कमी पडेल तरी प्रत्येकांच्या हाताला काम पोटाला भाकर अन्न, वस्त्र आणि राहायला निवारा असावा. मानवाच्या मुलभूत गरजा भागल्या पाहिजे. म्हणून बुद्ध- प्रबुद्धाचा निवाडा हा अतिरिक्त साधन संपत्तीचा उपयोग गरजवंतांना देवून जगवले पाहिजे. जगा आणि जगू द्या यासाठी गरज पेक्षा जास्त आहे ते गरजवंतांना दिले पाहिजे. म्हणून कवी म्हणतात...

अपेक्षा पेक्षा जास्त नको
अन्न वस्त्र निवारा दे
दीन दुबळ्या अनाथांना
तुझ्या मायेचा उभार दे (पृ.क्र.१०९)

ही अपेक्षा बुद्ध महात्मा फुले, महात्मा बसवेश्वर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची होती. त्यास सार्थ ठरण्याची भाषा कवीने केली आहे.

माणूस जन्म पुनःपुन्हा येणार नाही. आणि कितीही कमवले धन-दौलत- साधन संपत्ती तरी येथेच मागे ठेवून जायाचे आहे. हे अंतिम सत्य आहे म्हणून कवी म्हणतात.

जन्मा आल होता तेंव्हा
काय आणले संगे
आता धन द्रव्यामध्ये
मन तुझे दंगे
आज आहे उद्या आणखी
असेल कुणाचे (पृ.क्र.७८)
माझे माझे म्हणतो परंतु
आहे सारे व्यर्थ
कधी कळेल तुला अनंता जीवनाचा अर्थ (पृ.क्र.७८)

तेव्हा, 'काया वाचा मन-शुद्ध पवित्र ठेवून मनातले दुर्गन काढून जीवन जगावे, मानवी जीवनाचे काही खरे नाही. आज, आता, तांबाडेतोब, आहे आणि नाहीच होऊन जाते. तेव्हा माणसाने माणसासाठी जगावे, सर्वांच्या सुखाचा हिताचा कल्याणाचा, मंगलतेचा विचार आपण केला पाहिजे. तीच या भारत देशाची शिकवण आहे. या देशाची मुळ संस्कृती आहे. ती पुन्हा या देशात आली नांदली पाहिजे. आज नही तो कल जमाने बदलेगा' यावरती विश्वास ठेवून लेखन केले पाहिजे. लोकांनी तसे वर्तन करून जीवन जगले पाहिजे. अतिरिक्त कोणतीही साधन संपत्ती न बाळगता गरजवंतांना वितरीत करून त्यांचे जगणे सुखाचे करण्यात मानवी जीवनाचा अर्थ दडलेला आहे. आणि तो अर्थ बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरी विचारात गवसलेला आहे. म्हणून पिडीत दुःखीतांच्या मनात भीम आहे. 'असंख्य कोटी-कोटी जनात भीम आहे. हे भीम-युग- आंबेडकर युग म्हटले पाहिजे. जे जात-धर्म-वंश यांच्या पलीकडे जाऊन अनंताच्या विद्रोह मागचा अर्थ समजून घेतला पाहिजे. माणसांचे जे-जे- माणसं शोषण करतील, जो पर्यंत माणसं माणसांत येणार नाहीत, 'ते माझे मी त्यांचा आहे' हे घउत नाही तोपर्यंत हा अनंताचा अनंत काळ विद्रोह अनेक अंगाने चालू राहणारच आहे. तो विद्रोह विवेकशील असेल कारण बुद्ध- प्रबुद्धाची लढाई ही शस्त्राची नाही, विचाराची आहे. तो विचार अनंत जाधव घेवून निघालेत. आपणही सोबत गेले पाहिजे. असे मला वाटते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी चोरून नेल्याच्या घटना उघकीस आल्या




आहेत. पहिली घटना ही सिद्धेश्वर पेठ येथील फिर्यादी वरद संजय जट्टे (वय-२२-,रा.भुसार गल्ली) यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३. सी वाय.१७९३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.हि घटना २० मे रोजी घडली. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल परीट हे करीत आहेत. तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी सतीश श्रीधर माने (वय-३८-,रा.आनंदनगर,सांगोला) यांची दुचाकी क्रमांक एमएच.४५.ए.के.०६२० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २० मे रोजी मुरारजी पेठ येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

# पालखी मार्ग, तळांवर पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेले कामे प्राधान्याने करावीत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## पालखी मार्ग, तळांवर पाण्याच्या ट्रँकरची, स्नानगृहाची संख्या वाढवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ०१ जुलै २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. पालखी सोहळ्याच्या प्रथा परंपरेचे जतन करण्यासाठी पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेल्या पालखी मार्ग, पालखी तळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची कामे प्राधान्याने करावीत. तसेच पालखी सोहळ्या बरोबर येणाऱ्या वारकरी भाविकांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना




जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या पुर्वतयारीबाबत श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे व्हीसीव्दारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त मुख्याधिकारी संदिप कोहिनकर, मुख्याधिकारी प्रशांत जाधव व्हीसीव्दारे उपस्थित होते. तसेच प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, उप अभियंता भीमाशंकर मेटकरी, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुजकर आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, जिल्ह्यातील सर्वच पालखी तळावर कोठेही पाणी साठणार याची दक्षता घेवून, मुरमीकरण करुन घ्यावे. पालखी मार्ग, तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुबलक पाण्याची व्यवस्था करावी यासाठी टँकरची संख्या वाढवावी. पालखी सोहळ्यासह येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुरक्षा देण्यात यावी. तसेच मार्गावर वाहतुकीची समस्या निर्माण होणार नाही याबाबत नियोजन करावे. वाखरी येथे सर्वच पालखी सोहळे एकत्र येत असतात. याठिकाणी वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये तसेच वाखरी पालखी तळावरुन पंढरपूरकडे दिंड्या लवकर निघण्यासाठी सोहळा प्रमुखांशी पोलीस प्रशासनाने चर्चा करुन नियोजन करावे. पालखी मार्ग व तळांवर स्नानगृहाची व शौचालयाची संख्या वाढवावी. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करावीत अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी यावेळी दिल्या.

# महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विरार/केतन भोज : वारकरी परंपरेत आध्यात्मिक ओढ,भक्तिभाव आणि सामूहिक साधनेचा प्रसार करणाऱ्या श्री समर्थ कृपा भजन मंडळ,नालासोपारा (विरार)यांच्या वतीने १५ वा वर्धापन दिन रविवार,८ जून २०२५ रोजी साजरा होणार असून,या दिवशी महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे श्रवणीय,प्रभावी आणि समाजमनाला जागं करणारे कीर्तन भक्तजनांना मोरेश्वर विद्यालयाजवळ,मोरेगाव नाका,विरार रोड,नालासोपारा (पूर्व),ता.वसई,जि.पालघर - ४०१२०९ येथे आयोजन केले आहे.



संतांची शिकवण आणि भक्तीचा सोहळा या संकल्पनेतून हा कार्यक्रम सजलेला असून,दिवसभर आध्यात्मिक,सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी दिवसभराचा कार्यक्रम :सकाळी ६.०० वा.-श्री सत्यनारायण महापूजा,सकाळी ८.०० वा. -दीपप्रज्वलन व सामूहिक पालखी सोहळा,स.९.४३ वा.-विशेष गाडी वेळ - विरार ते चर्चगेट दुपारी - पंचपदी परीक्षक सत्कार,नंतर भव्य भजन स्पर्धा स्पर्धा वैशिष्ट्ये १५० पेक्षा अधिक भजन मंडळांचा सहभाग,धोंढीलश डळींश प्रसारण, दुपारी - स्नेहभोजन, -कुंकू समारंभ सायं.५.०० वा.- ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांचे प्रबोधनात्मक कीर्तन, रात्रौ ७.१५ वा.-मान्यवर सत्कार व भजन स्पर्धेचे बक्षीस वितरण.

या कार्यक्रमा साठी संत सेवा भजन सामाजिक संस्था,संत ज्ञानेश्वर माऊली भजन संस्था यांसह अनेक नामवंत मंडळे सहभागी होणार असून, जिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे.

**श्री समर्थ कृपा भजन मंडळाच्या १५ व्या वर्धापन दिनाचा भक्तिमय सोहळ्याचे आयोजन**

अध्यक्ष - अरविंद मोरे, संस्थापक - ह.भ.प.विश्वनाथ बांद्रे, कार्याध्यक्ष - प्रणव लांबाडे, खजिनदार - जनार्दन शिंदे (बापू),सचिव - गजानन जोशी,उपाध्यक्ष - राजेश येले, सहखजिनदार - राजुदादा पाडावे, उपसचिव - अनिल बेकरे, संपर्क प्रमुख - सचिन धाडवे, सदस्य - सत्यवान केसरकर, संदीप तावडे, सुनील पांढरे व इतर कार्यकर्ते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व पदाधिकारी व सदस्य अत्यंत नियोजनपूर्वक तयारी करत असून,श्री समर्थ कृपा भजन मंडळा तर्फे सर्व वारकरी भक्त,भजनप्रेमी आणि श्रद्धावंत भाविकांना या भक्तिरसात न्हालेल्या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भक्ती, कीर्तन, आणि संतांची शिकवण यांचा संगम अनुभवण्यासाठी आपण उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलिसांना पत्ता दिल्याचा राग मनात धरून तरुणास मारहाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील वनगळी येथेल तरुणास पोलिसांना माहिती दिली म्हणून दोघांना मारहाण केल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी चौघा जणांच्या विरोधात इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन याबाबत फिर्यादी श्याम बरू महापुरे (वय २४, व्यवसाय मोटार रिवायडिंग, रा. वनगळी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सविस्तर वृत्त असे की मंगळवार दिनांक २०/५/२०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास वनगळी येथे फिर्यादीच्या राहत्या घरासमोरील रस्त्यावर गावातीलच १)महेश गायकवाड २) किरण बाळू चव्हाण ३)मारुती सुरवसे ४)अप्पा गायकवाड हे आले व त्यातील आरोपी क्रमांक १ महेश याने फिर्यादीस, 'पोलिसांना तुच पत्ता दिला,' असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तर आरोपी क्रमांक ४ अप्पा याने तेथे पडलेल्या लाकडी फळीने डोक्यावर उजव्या बाजूस मारून दुखापत केली. तर आरोपी क्रमांक २किरण व आरोपी क्रमांक३ मारुती व महेश यांनी फिर्यादीचा भाऊ अजय महापुरे यास हाताने मारहाण करून, 'तुम्हाला परत बघून घेतो.'' अशी धमकी देऊन तेथून निघून गेले. यावरून या चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहे.

## किरकोळ कारणावरून लाकडाने मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर/प्रतिनिधी : किरकोळ कारणावरून हाताने व लाकडी धाडक्याने मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १९ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास गोंधळी गल्ली येथे घडली.याप्रकरणी सरूबाई चंद्रकांत उगाडे (वय-६४-,रा.गोंधळी गल्ली) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रोहिणी मळगे,राधिका देवकते,रोहित जमगे,किरण जमगे (सर्व रा.गोंधळी गल्ली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा मुलगा दीपक हा त्याच्या दुचाकीवरून घराकडे येत असताना वरील सार्वजनिक रस्त्यावर वरील संशयित आरोपी यांनी पुरेसा रस्ता न दिल्याने दीपक याला पायाला खरचटले म्हणून फिर्यादी सांगण्यासाठी गेल्या असता वरील संशयित आरोपी यांनी मुलगा दीपक,भावजय काशीबाई व नारायण उगाडे यांना हाताने व लाकडाने तसेच फरशीने मारहाण करून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सोनार हे करीत आहेत.

# गरीब रूग्णांना रूग्णालयात उपचारासाठी धर्मादाय योजनेतर्गंत रूग्णालयांची नावे जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अक्कलकोट ,मंगळवेढा, सांगोला , मोहोळ, बार्शी , पंढरपूर व आजू बाजूच्या जिल्ह्यातील बहुसंख्य रूग्ण उपचाराकरिता येत असतात, रूग्णांना रूग्णालयांमध्ये धर्मादाय योजनांचा लाभ मिळत नसल्याने व रूग्णांना अनेक अडचणीस सामोरे जावे लागत असल्याने सदर हॉस्पिटल मध्ये धर्मादाय योजनांचा १०० टक्के लाभ रुग्णांना मिळावा म्हणून सोलापूर जिल्ह्यातील धर्मादाय रूग्णालयांची यादी पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

रुग्णालयाचे नाव व संपूर्ण पत्ता:- १) श्रीमती मल्लावाबाई वल्याळ चॅरिटेबल डेंटल हॉस्पिटल, २,३, गणेश शॉपींग सेंटर, सोमवार पेठ, सोलापूर.- वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्रीनिवास मंताठी मोबाईल क्र. ९४२३५३६१८८,

२)पंडीत दिनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय व हॉस्पिटल, १९/१, पंडीत दिनदयाल उपाध्याय डेंटल कॉलेज, केगांव, देगाव रोड, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- संतोष देशमाने मोबाईल क्र. ७९७२६८८२२४,

३)अश्विनी रुरल मेडीकल कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, गट नं. २६१ आणि २६२, कुंभारी, अश्विनी रुरल मेडीकल कॉलेज, हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर, कुंभारी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :-उमाकांत ढगे मोबाईल क्र. ९४२३५९०४१५, डॉ. करजखेडे मोबाईल क्र.७७१९०९४२१६,

४)श्री विठ्ठल हॉस्पिटल, पुणे रोड, के.बी.पी. कॉलेजच्या समोर, पंढरपूर, जि. सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- नुतन मोरे मोबाईल क्र. ९९२२१९५१४२,

५) शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेद रुग्णालय, ११८/११९, शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेदीक हॉस्पिटल, जुनी फौजदार चावडी जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री. डी. आर.समर्थ मोबाईल क्र. ८७६६८२५१६१,

६) अल-फैज जनरल हॉस्पिटल, सिध्देश्वर पेठ, बेगम पेठ पोलिस चौकी जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- बिलाल मोमीन मोबाईल क्र. ९११२९९२४२१,

७) यशोधरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, ६१५८, सिध्देश्वर पेठ, जिल्हा परिषद जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री. सुकांत बेळे मोबाईल क्र. ९५९५२५८४८८,

८) श्री. सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, २७६/१ पी, दैनिक संचार ऑफीस जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री हनमंत पाटील मोबाईल क्र. ८८०५४५०५६५,

९) जगदाळे मामा हॉस्पिटल, कर्मवीर नगर, बार्शी, जि. सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री. सचिन गारमपल्ली मोबाईल क्र. ९६७३७५५६२०,

१०) युगांधर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, २८३/ १ बी, होटगी रोड, मुलतानी बेकरी मागे, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री राहुल यमाजी मोबाईल क्र. ९४०३४१२२४९,

११) नर्गीस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, बाशी, आगळगाव रोड, जि. सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- श्री. राहुल शिराळ मोबाईल क्र. ९८२२७४१५२९,

१२) लायन्स मथुराबाई फत्तेचंद ब्रिजमोहन दमाणी हॉस्पिटल, लॉयन बी.पी. नेत्रालय, मथुराबाई फत्तेचंद हॉस्पिटल, १२५, दमाणी नगर, पावन गणपती जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- डॉ. शिवाजी पाटील मोबाईल क्र. ९६६५६९६३१५,

१३) लोकमंगल जीवक हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, पी १२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल ट्रस्ट, एम.आय.डी.सी. प्लॉट नं. १२, निलम नगर, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- अंबादास सिलगारी मोबाईल क्र. ८९७५७२२०९३,

१४) इंडियन कॅन्सर सोसायटी, ८३८९/बी, रेल्वे लाईन, जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- पियुषा देशपांडे मोबाईल क्र. ९९७५५०२५४४,

१५) गांधीनाथा रंगजी हॉस्पिटल, १३, बुधवार पेठ, बाळीवेस रोड, विद्यानंद कॉ. ऑप बँके जवळ, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- रमेश कांबळे मोबाईल क्र. ९८५०३२८३२४,

१६) धनराज गिरजी हॉस्पिटल ट्रस्ट, ४, रेल्वे लाईन, सोलापूर महानगरपालिकेच्या मागे, सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- चोपडे एच.एस. मोबाईल क्र. ९८५०९८९०५३, १७) जनकल्याण हॉस्पिटल, ६२/१/२, जनकल्याण हॉस्पिटल, पंढरपूर, जि. सोलापूर. वैद्यकीय समाजसेवकांचे नाव व संपर्क :- डॉ. सुधीर शिनगारे मोबाईल क्र. ९९२२६१४७२४

**आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा पिकांचे नुकसान** — **नुकसान भरपाई मिळण्याची मागणी**

# पंढरपूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे ९३.३७ हेक्टर पिकांचे नुकसान










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात दि. १३ ते २१ मे दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे १५४ शेतकऱ्यांचे नजरअंदाज ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा आदी पिकांचा समावेश आहे. तसेच एकलासपुर येथे तीन घरांची पडझड झाली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

तालुक्यात दिनांक १३, १५ व १९ मे २०२५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील तावशी, तुंगत, बाभुळगाव, आढीव, रोपळे, शेटफळ, खेडभाळवणी, गादेगाव, शिरगाव, कोर्टी, बोहाळी आदी गावांतील १५४ शेतकऱ्यांचे ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे एकलासपुर येथील ३ घरांची पडझड होवून नुकसान झाले असून, शिरगाव येथे अंगावर झाड पडून १ गाय मयत झाली आहे. याबाबतचे पंचनामे करण्याचे कामकाज सुरु असल्याची माहिती तहसिलदार लंगुटे यांनी दिली.

तसेच दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वाऱ्यांमुळे होणाऱ्या नुकसानीबाबतचे पंचनामे करुन दिनांक १ जून २०२५ पर्यंत कृषीसहाय्यक, ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश तहसिल कार्यालयाकडून देण्यात आले असून, तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबतचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयमार्फत शासनास सादर करण्यात येईल.असेही तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

## थोडक्यात...




### पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत घरातून हाकलले; पतीसह तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत मारहाण करून माहेरून पैसे आण असे म्हणत आर्थिक त्रास देऊन घरातून हाकलून दिल्याची फिर्याद शाहीन बाबू शेख (वय-२६,रा.विजय नगर,नई जिंदगी) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती बाबू शेख साबेरा, ननंद रेश्मा (सर्व.रा.लेप्रसी कॉलनी,कुमठा नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १ जुलै २०१९ ते २० फेब्रुवारी २०२४ पर्यंतच्या दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

# मंगळवेढ्यात उसळला देशभक्तीचा महापूर

## 'भारत माता की जय'चा जयघोष...







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा : 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचा सन्मान करत आज हजारो मंगळवेढेकरांनी मोटार सायकल तिरंगा यात्रेत भाग घेतला. भारतमाता आणि सैन्यदलाच्या जयघोषांनी निनादलेले रस्ते, हाती तिरंगा, हृदयात राष्ट्रभक्ती... हे दृश्य अविस्मरणीय होतं.

दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारतीय सेनेने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, हा नवभारत आहे, जो आपल्या शत्रूंना घरात घुसून प्रत्युत्तर देतो!

पाकिस्तानसारख्या दहशतवादी प्रवृत्तीला ठोस उत्तर देत, भारताने संपूर्ण जगाला दाखवून दिलं की, आपली सार्वभौमता आणि सुरक्षेचा कुणीही भंग केला तर त्याचा योग्य बंदोबस्त केला जाईल.

भारतमाता आणि भारतीय सैन्यदलाच्या जयघोषणाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. यावेळी सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या संख्येने असलेली उपस्थिती ही भारतीय सैन्यदलाला नागरिकांचा किती मोठा पाठिंबा आहे, याची साक्ष देणारी होती.

या यात्रेत माझ्यासह तालुक्यातील सामाजिक, राजकीय व व्यावसायिक तसेच इतर क्षेत्रातील अनेक देशप्रेमी मंगळवेढाकरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून भारतीय सेनेच्या कार्याला सलाम केला.

आपल्या देशासाठी, लाखो सामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी स्वतःचा जीव पणाला लावणाऱ्या सर्व भारतीय जवानांना मानाचा सलाम!



# जेजुरी नगरपरिषद प्रशासनाने पुतळा पुनर्वसन समितीशी समन्वय ठेवून काम करावे : अविनाश भालेराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर: जेजुरी येथील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नवीन जागेतील पुतळा परिसराचे सुशोभीकरणाचे काम करताना , जेजुरी नगरपरिषद प्रशासनाने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समितीशी समन्वय ठेवून काम करावे अशी मागणी पुतळा पुनर्वसन समितीचे अध्यक्ष व जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव यांनी मुख्याधिकारी यांच्याशी चर्चा करताना केली

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समितीच्या शिष्टमंडळाने मंगळवार दि. २० मे रोजी पुतळा पुनर्वसन समितीचे अध्यक्ष व जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव यांच्या नेतृत्वाखाली जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांची भेट घेऊन , विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समितीचे मा. धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात अधिकृत नोंदणी केलेल्या नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रत व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे पुनर्वसन करताना पुतळा पुनर्वसन समितीशी समन्वय ठेवून व पुतळा पुनर्वसन समितीला विश्वासात घेऊन काम करावे याबाबतचे लेखी निवेदन दिले.

यावेळी मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांच्याशी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या पुनर्वसना बाबत सविस्तर चर्चा केली.

पुतळा पुनर्वसन समितीने सुचविलेल्या शिफारसीचा सन्मान पूर्वक विचार करुन त्या स्विकारल्या जातील व समितीशी समन्वय ठेवून काम केले जाईल असे आश्वासन मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांनी शिष्टमंडळाला दिले. यावेळी पुतळा पुनर्वसन समितीचे अध्यक्ष अविनाश भालेराव, उपाध्यक्ष विष्णुदादा भोसले सचिव तानाजी भालेराव खजिनदार संदीपआप्पा जगताप सदस्य सुनिल जगताप रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, कार्याध्यक्ष सुधीर शेलार, जेजुरी शहर रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे शहर अध्यक्ष रंजित भालेराव, पुरोगामी संघर्ष परिषदेचे युवानेते मनोज भिसे, निखिल आढाळगे, अलंकार शेलार, वृंदण शितोळे, ऋषिकेश पवार, संकेत कापरे, करण सोनवणे, निखिल गंगावणे, धिरज भालेराव, सुरज भालेराव, सौरभ भालेराव, विजय खोमणे, शुभम यादव, संतोष खोमणे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## आयआरसीटीसी भारत गौरव टुरिस्ट ट्रेनद्वारे छत्रपती शिवाजी महाराज सर्किटवर हेरिटेज टूर पहिल्या शंभर बुकिंग साठी ५% ची सूट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : रायगड किल्ला, पुणे (लाल महाल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी), शिवनेरी किल्ला, भीमाशंकर ज्योतिर्लिंग, प्रतापगड किल्ला आणि कोल्हापूर (महालक्ष्मी मंदिर आणि पन्हाळा किल्ला) कव्हर करण्यासाठी आयआरसीटीसी ची खास टूर ऑफर आहे.

बहुचर्चित ट्रेन टूर छत्रपती शिवाजी महाराज सर्किट टूर ०९ जून २०२५ रोजी निघण्यासाठी सज्ज आहे. ०५ रात्री आणि ०६ दिवसांचा हा प्रवास छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनपासून सुरू होईल. अत्याधुनिक भारत गौरव एसी टुरिस्ट ट्रेन ज्यामध्ये स्लीपर, एसी - २ टियर आणि एसी ३ टियर कोच आहेत आणि एकूण ७४८ पर्यटकांना सामावून घेण्याची क्षमता आहे या टुरिस्ट ट्रेनमध्ये दादर आणि ठाणे रेल्वे स्टेशनवरूनही पर्यटक चढू शकतात. आयआरसीटीसी आपल्या प्रकारचा पहिला हेरिटेज टूर 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' वर चालवण्यास सज्ज आहे ज्यामध्ये मराठा राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या स्थळांचा समावेश असेल. ०६ दिवसांचा हा प्रवास कार्यक्रम पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) पासून कोकण रेल्वे नेटवर्कवरील माणगाव रेल्वे स्टेशनसाठी सुरू होईल, जो रायगड किल्ल्यासाठी सर्वात जवळचा रेल्वे दुवा आहे. पहिले गंतव्यस्थान रायगड आहे, जे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक किंवा राज्याभिषेक झालेल्या डोंगरी किल्ल्यासाठी ओळखले जाते आणि नंतर तेथून त्यांनी राज्य केले तेथून त्यांची राजधानी बनले. प्रेक्षणीय स्थळे पाहिल्यानंतर, पर्यटक पुन्हा ट्रेनमध्ये परततील आणि पुढील गंतव्यस्थान पुणे येथे जातील जिथे पर्यटक जेवण करतील आणि त्यानंतर पुण्यातील हॉटेलमध्ये रात्रीचा मुक्काम करतील. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, पर्यटक पुण्यातील लाल महाल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी ही प्रमुख ठिकाणे पाहणार आहेत. नावाप्रमाणेच लाल महाल हा छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी भोसले यांनी ई.स. १६३० मध्ये त्यांच्या पत्नी जिजाबाई आणि मुलासाठी बांधलेला लाल रंगाचा राजवाडा आहे. सध्याची ही वास्तू १९८४ मध्ये लाल महाल असलेल्या जमिनीच्या एका भागात पुन्हा बांधण्यात आली आणि त्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे वर्णन करणारे तैलचित्रांचा एक विशाल संग्रह आहे. पुण्याचे प्रमुख दैवत असलेल्या कसबा गणपतीचे मंदिर ई.स १८९३ चे आहे आणि ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई जिजाबाई यांनी बांधले असल्याचे मानले जाते. तेव्हापासून, हे शहर गणेशाचे शहर म्हणून ओळखले जाते. नंतर, पर्यटक शिवसृष्टीला भेट देतील - छत्रपती शिवाजी महाराजांच्या आख्यायिकेचे प्रदर्शन करणारे सर्वात मोठे ऐतिहासिक थीम पार्क. पर्यटक मराठा शासकाची जीवनकथा ३ऊ मध्ये पाहतील आणि इतर संवादात्मक सत्रांचा आनंद घेतील. पुण्यात रात्रीच्या विश्रांतीनंतर तिसऱ्या दिवशी पाहुणे पुणे शहरापासून ९५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शिवनेरीकडे प्रयाण करतील. शिवनेरी किल्ला जुन्नर शहराच्या कडेला टेकडीवर वसलेला आहे. हे छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान आणि मराठा अभिमानाचे आणि मुस्लिम राजवटीच्या प्रतिकाराचे प्रतीक आहे. दुपारच्या जेवणानंतर, पर्यटक रात्रीच्या मुक्कामासाठी पुण्याला परतण्यापूर्वी १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराला भेट देतील. प्रवासाच्या ४थ्या दिवशी, पर्यटक साताऱ्याच्या पुढील प्रवासासाठी ट्रेनमध्ये चढतील. छत्रपती शिवाजी महाराज आणि विजापूर सल्तनतचा सेनापती अफझल खान यांच्यात ई.स १६५९ मध्ये झालेल्या प्रतापगडाच्या लढाईमुळे प्रतापगड किल्ला हा या स्थानकापासून कव्हर केला जाणारा प्रमुख स्थळ आहे. या लढाईने मराठा साम्राज्याच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली होती. भेटीनंतर, पर्यटक योग्य ठिकाणी दुपारचे जेवण घेतील आणि या दौऱ्याच्या शेवटच्या गंतव्यस्थान कोल्हापूरला जाताना ट्रेनसाठी परत जातील. अधिक माहितीसाठी, तुम्ही खठउढउ वेबसाइटला भेट देऊ शकता https://www.irctctourism.com आणि वेब पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर ऑनलाइन बुकिंग उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी, तुम्ही IRCTC शी ८२८७९३१८८६ वर संपर्क साधू शकता.



## सौ.गौराबाई सागर चिगरे यांची उपसरपंचपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील ग्रामपंचायत उपसरपंच पदी सौ गौराबाई सागर चिगरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी ग्रामसेवक नंदकुमार निर्मळे, सरपंच मंगल बिरणगे, माजी सरपंच विद्यमान सदस्य तुकाराम चिगरे, भरत निर्मळे, भरत पाटील, सौ.हौसाबाई हक्के, श्रीमती प्रेमिला आवटी, सर्व ग्राम पंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या पुढाकारातून १२६ महसुली मंडळापैकी ७६ मंडळात समाधान शिबिरांचे आयोजन, उर्वरित मंडळातही शिबिरे प्रस्तावित**

# जिल्ह्यात महाराजस्व अभियानात ७७ हजार २०६ विविध दाखल्यांचे वाटप

**एक ही शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दाखल्या अभावी शैक्षणिक प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाच्या वतीने गतिमान पद्धतीने शिबिरांचे आयोजन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विविध शासकीय योजना यांच्यासाठी लागणारे प्रमाणपत्र वाटप जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याच्या महसुली मंडळात शिबिराच्या माध्यमातून करण्यात यावे असे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दिलेले होते. त्या अनुषंगाने दिनांक २५ मार्च २०२५ पासून ते २१ मे २०२५ पर्यंत १२६ महसुली मंडळापैकी ७६ महसुली मंडळात समाधान शिबिराचे आयोजन करून जातीचे दाखले, उत्पन्न, अधिवास, रहिवासी दाखले, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र व इतर दाखले असे एकूण ७७ हजार २०६



दाखल्यांचे वाटप करून विद्यार्थी व पालक यांची शैक्षणिक प्रवेशासाठी होणारी गैरसोय टाळण्यात प्रशासन यशस्वी होत आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ ची सुरुवात माहे जून २०२५ पासून होत आहे या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी आवश्यक जातीचे दाखले, उत्पन्न अधिवास रहिवास दाखले तसेच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व अन्य दाखले हे सर्व विद्यार्थी व पालकांना वेळेत मिळावे यासाठी शासनाच्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली ११ तहसील कार्यालय व एक अप्पर तहसील कार्यालय यांच्या अंतर्गत असणाऱ्या १२६ महसुली मंडळात समाधान शिबिरे आयोजन करून परिसरातील विद्यार्थी व पालकांना आपले वाटत केले जात आहेत. दिनांक २१ मे २०२५ पर्यंत ७६ शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व पंचवीस मंडळात शिबिरे घेण्यात आलेली आहे, तर ज्या महसुली मंडळात अद्याप पर्यंत शिबिरे घेण्यात आलेली नाहीत त्या मंडळाने शिबिरांचे आयोजन करून दाखले वाटप करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत.

दिनांक एक मे २०२५ ते २१ मे २०२५ या कालावधीत महाराजस्व अभियाना अंतर्गत २९६९ जातीचे दाखले, १८८३७ उत्पन्नाचे दाखले, २२७९ आदिवासी दाखले, २०९२ रहिवास दाखले, २७२६ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तर २६६६ इतर दाखले असे एकूण ३१ हजार ५६९ विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणेच दिनांक २५ मार्च २०२५ पासून ते एप्रिल २०२५ अखेरपर्यंत एकूण ४५ हजार ६३७ विविध दाखले वाटप करण्यात आलेले आहेत तर आज रोजी पर्यंत ७७ हजार २०६ विविध शालेय दाखल्यांचे वाटप करून जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचे काम प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

> **छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ११ तहसील कार्यालय व एक अप्पर तहसील कार्यालय अंतर्गत च्या १२६ महसुली मंडळात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध दाखले व प्रमाणपत्राच्या वाटप करण्यासाठी दिनांक २५ मार्च २०२५ पासून समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे आज रोजी पर्यंत ७६ शिबिरांचे आयोजन झाले असून ७७ हजार २०६ विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित महसुली मंडळातही शिबिरे घेण्याचे प्रस्तावित आहे.**
>
> **एक ही विद्यार्थी दाखल्या अभावी शैक्षणिक प्रवेशापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.**
>
> **- श्री. कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी, सोलापूर**

महसुली मंडळास्तरावरच विविध दाखले वाटपाचे शिबिरे घेण्यात येत असल्याने शालेय विद्यार्थी व पालक समाधानी असून याच पद्धतीने प्रत्येक वर्षी शिबिरांचे आयोजन करावे. यातून शिबिराच्या ठिकाणी विविध दाखले मिळत असल्याने पालकांचा वेळ तसेच तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी खर्चाची बचत होत आहे. दाखले वेळेत मिळत असल्याने शैक्षणिक प्रवेशासाठी होणारी धावपळ कमी होत आहे.

दिनांक २५ मार्च २०२५ ते आज रोजी पर्यंत ११ तहसील कार्यालय व एक अपर तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या शिबिरांची संख्या व वाटप केलेल्या दाखल्याची संख्या खालील प्रमाणे....

१.उत्तर सोलापूर तहसील कार्यालय २५ महसूल मंडळे, २५ शिबिरांचे आयोजन तर १७७९६ विविध शालेय दाखल्यांचे वाटप. २.बार्शी तहसील कार्यालय, महसूल मंडळ ११, शिबिरे ९, आठ हजार २०२ दाखल्यांचे वाटप. ३. दक्षिण सोलापूर तहसील कार्यालय, मंडळाची संख्या ४, शिबिरे ४, दाखले वाटप १५७२. ४. अप्पर तहसील मंद्रूप -महसूल मंडळे ४, शिबिरे ४, दाखले वाटप १७४६. ५. अक्कलकोट-महसूल मंडळे १० शिबिरे-०, दाखले वाटप ३४०६, ६. माढा महसूल मंडळ ११, शिबिरे ०, दाखले वाटप ५३८५ तसेच ११ ठिकाणी शिबिरे प्रस्तावित आहेत. ७. करमाळा -महसूल मंडळे ११, शिबिरे १, दाखले वाटप ६०१६. ८.पंढरपूर - महसूल मंडळे ११, शिबिरे १२, दाखले वाटप ६५५०. ९. मोहोळ - महसूल मंडळे ९, शिबिरे ९, दाखले वाटप ५०२५. १०.मंगळवेढा - महसूल मंडळे ८, शिबिरे ०, दाखले वाटप ५५९५. ११.सांगोला - महसूल मंडळ १०, शिबिरे ०, दाखले वाटप ७४४४ आणि १२. माळशिरस -महसूल मंडळे १२, शिबिरे १२, दाखले वाटप ८४६७.